देश - विदेश

मद्यविक्री धोरणाने दोन हजार कोटींचा फटका

'कॅग'च्या अहवालात दिल्लीतील तत्कालीन 'आप' सरकारवर ठपका

नवी दिल्ली, दि. २६ (वृत्तसंस्था) : दिल्लीतील तत्कालीन 'आप' सरकारच्या वादग्रस्त मद्यविक्री धोरणामुळे दोन हजार कोटींचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा महालेखापरीक्षकांच्या अहवालात करण्यात आला असून 'कॅग'चा हा अहवाल मंगळवारी दिल्ली विधानसभेत भाजप सरकारने मांडला. या अहवालामुळे 'आप' नेत्यांच्या अडचणीमध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विधानसभा अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी 'कॅग'च्या अहवालामुळे कोंडी होत असल्याचे दिसू लागल्याने विरोधी आम आदमी पक्षाच्या आमदारांनी सभागृहात गदारोळ केला. त्यामुळे विधानसभाध्यक्ष वीरेंद्र गुप्ता यांनी 'आप'च्या २१ आमदारांना तीन दिवसांसाठी निलंबित केले. कथित मद्यविक्री घोटाळ्यात 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, संजय सिंह आदी नेत्यांना तुरुंगात जावे लागले होते. मद्याघोटाळ्यावरून भाजपने दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'ला लक्ष्य केले होते. 'कॅग'चा अहवाल अधिकृतपणे प्रसिद्ध झाला नव्हता, तरीही निवडणूक प्रचाराच्या काळात भाजपने 'कॅग'च्या अहवालातील 'निष्कर्ष' ऐरणीवर आणले होते. सत्ता मिळाली तर तातडीने 'कॅग'चा अहवाल विधानसभेत मांडला जाईल, असे आश्वासनही भाजपने दिले होते. त्यानुसार मंगळवारी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी विधानसभेत 'कॅग'चा अहवाल अधिकृतपणे मांडला.

कॅगचे ताशेरे

परवाना वाटप, मूल्यनिर्धारण, गुणवत्ता नियंत्रण, नफ्याचे प्रमाण अशा विविध मुद्द्यांसंदर्भात नियमांचा भंग झाल्याचे ताशेरे 'कॅग'च्या अहवालाने तत्कालीन 'आप' सरकारवर ओढले आहेत. नवे मद्याधोरण अमलात आणताना सक्षम प्रशासकीय अधिकाऱ्याची मंजुरी घेतली गेली नाही. नव्या उत्पादन शुल्काची अंमलबजावणी करताना 'आप' सरकारच्या मनमानी कारभारामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागले, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

'आप'च्या २१ आमदारांचे निलंबन

विधानसभेत झालेल्या गदारोळानंतर विधानसभाध्यक्षांनी 'आप'च्या २१ आमदारांना निलंबित केले. यानंतर या आमदारांनी विधानसभेच्या आवारात धरणे दिले. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या कार्यालयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे छायाचित्र काढून टाकल्याचा दावा विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी केला. डॉ. आंबेडकरांची जागा पंतप्रधान मोदी घेऊ शकतात असे भाजपला वाटू लागले आहे, असा आरोप आतिशी यांनी केला. डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र पूर्वी होते तसे लावले जात नाही तोपर्यंत आम्ही आंदोलन करू, असा इशाराही आतिशी यांनी दिला.

बोर्ड परीक्षेच्या काही तासांनंतर १० वीच्या विद्यार्थिनीने दिला बाळाला जन्म

शाळा प्रशासनाला पत्ताच नाही

नवी दिल्ली, दि. २६ (वृत्तसंस्था) : सरकारी निवासी शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनीने बोर्डाची परीक्षा दिल्यानंतर एका बाळाला जन्म दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ओडिशाच्या मलकानगिरी जिल्ह्यातील सरकारी निवासी शाळेत हा प्रकार घडला आहे. शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या या मुलीने बोर्डाची परीक्षा देऊन परतल्यानंतर चित्रकोंडा उपविभागीय रुग्णालयात मुलाला जन्म दिला. मीडिया रिपोर्टनुसार ही मुलगी नियमित शाळेत जात राहिली, इतकेच नाही तर तिने बोर्डाची परीक्षा देखील दिली. मात्र तिच्या स्थितीबद्दल शाळा प्रशासनाला कसलीही कल्पना नव्हती. या मुलीच्या पालकांनी शाळेच्या प्रशासनाला यासाठी जबाबदार धरले आहेत. तर शिक्षकांनी मुलगी राहत होती त्या हॉस्टेलच्या वॉर्डनवर दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर चित्रकोंडा पोलिस आणि जिल्हा कल्याण अधिकारी (DWO) यांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. परिस्थितीकडे दुर्लक्ष कसे झाले याबद्दल आणि पुढे काय कारवाई करावी याचा निर्णय घेण्यासाठी अधिकाऱ्यांवर आता दबाव वाढला आहे. चित्रकोंडा पोलिसांना या घटनेबद्दल माहिती देताना निवेदन जारी केले आहे. त्यामध्ये सांगण्यात आले आहे की, "घटनेचा तपास सुरू आहे. कुटुंबाकडून अद्याप कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही कारण ते अजूनही रुग्णालयात आहेत, परंतु त्यांनी परतल्यानंतर तक्रार दाखल करतील असे आम्हाला सांगितले आहे."

पोलिसांनी काय सांगितलं?

पोलिसांच्या निवेदनात सांगण्यात आले आहे की, १५ वर्षीय मुलीचे कथितरित्या एका स्थानिक मुलाबरोबर प्रेमसंबंध होते आणि तो मुलगाच या मुलाचा पिता आहे. आम्ही आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहोत. आतापर्यंत तरी शाळा किंवा जिल्हा प्रशासनाकडून या प्रकरणाबद्दल अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मुलगी आणि तिच्या बाळावर सध्या मलकानगिरी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असेही पोलिसांनी दिलेल्या निवेदनात सांगण्यात आले आहे.

हातोडीने डोकी फोडली, आजी, भाऊ व प्रेयसीसह कुटुंबातील पाच जणांची क्रूर हत्या

पोलिसांसमोर कबुलीजबाब देत सांगितलं कारण

केरळ, दि. २६ (वृत्तसंस्था) : केरळच्या तिरुअनंतपुरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका २३ वर्षीय तरुणाने त्याची आजी, भाऊ आणि प्रेयसीसह एकूण सहा जणांची हत्या केल्याचा पोलिसांसमोर कबुलीजबाब दिला आहे. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे. सोमवारी सायंकाळी काही तासांत तीन वेगवेगळ्या ठिकाणी या हत्याकांडाच्या घटना घडल्या. हत्या केल्यानंतर आरोपी अफान याने स्वतःहून पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. आखाती देशांत अफानच्या कुटुंबाचा व्यवसाय होता. हा व्यवसाय डबघाईला आल्याने त्यांच्यावर कर्जाचा डोंगर तयार झाला होता. त्यातच त्याला आखाती देश सोडून भारतात परतावं लागलं होतं. दरम्यान, त्याच्या माहितीवर संपूर्णपणे अवलंबून न राहता पोलिसांनी अधिक चौकशी व तपास सुरू केला आहे. अफानचा मोबाईल जप्त केला असून त्याचे कॉल डिटेल्स तपासले जात आहेत. तसंच, त्याला ड्रग्सचं व्यसन आहे का हेही तपासलं जात आहे. अफानने सहा हत्या केल्याचा दावा केला असला तरी त्यापैकी एक व्यक्ती अद्याप मृत्यूशी झुंजत आहे. अफानच्या आईला जखमी अवस्थेत पोलिसांनी रुग्णालयात दाखल केलं असून त्यांच्यावर उपचार चालू आहेत. त्यामुळे अफानने एकूण पाच खून केले आहेत. अफान २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता त्याच्या घरून निघाला. घरापासून २५ किलोमीटर अंतरावर त्याची आजी सलमा बीबी राहत होती. आजीच्या घरी जाऊन त्याने हातोडीने आजीचं डोकं फोडलं आणि तिला ठार केलं. त्यानंतर त्याने हातोडी स्वच्छ केली व तिथून बाहेर पडला. तिथून तो त्याच्या काकाच्या घरी गेला. आजीच्या घरापासून पाच किमी अंतरावर त्याचे काका लतीफ राहत होते. काका समोर दिसताच अफानने खिशातली हातोडी काढली व त्यांचं डोकं फोडलं. त्यानंतर त्याने त्याची काकी सजिदाच्या डोक्यावर हातोडीने अनेक घाव घातले. दोघेही मृत्यूमुखी पडले आहेत याची खात्री करून आणि हातोडी स्वच्छ करून तो काकाच्या घरातून बाहेर पडला.

'गेनबिटकॉईन' घोटाळा प्रकरणी सीबीआयचे देशभरात छापे

महत्त्वाचे पुरावे हाती लागल्याचा दावा

नवी दिल्ली, दि. २६ (वृत्तसंस्था) : 'गेनबिटकॉईन' आभासी चलनासंबंधाने (क्रिप्टो करन्सी) ६,६०० कोटींच्या घोटाळा प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मंगळवारी देशभर ६० ठिकाणी छापे टाकले. विविध राज्यांमध्ये ही कारवाई दिवसभर सुरू राहिली. दिल्लीसह, पुणे, चंडिगड, नांदेड, कोल्हापूर, बंगळुरु येथे छापे टाकण्यात आले. या घोटाळ्यातील संशयितांशी संबंधित ठिकाणी कारवाई केल्याचे सीबीआयच्या प्रवक्त्यांनी स्पष्ट केले. गेनबिटकॉइन डॉट कॉम या संकेतस्थळाच्या माध्यमातून चालविल्या गेलेल्या पॉन्झी घोटाळ्याचा सूत्रधार अमित भारद्वाज (सध्या मयत) आणि त्याचा भाऊ अजय भारद्वाज असल्याची माहिती पुढे आली आहे. वेरिएबलटेक पीटीई लिमिटेड या कंपनीच्या मुखवट्याखाली २०१५ मध्ये त्यांच्या बेकायदेशीर कारवायांना सुरुवात झाली. बिटकॉइनमध्ये गुंतवणुकीतून १८ महिन्यांत प्रति महिना दहा टक्के परताव्याचे अमिष गुंतवणुकदारांना त्यांच्याकडून दाखविण्यात आले. परदेशातील बाजारमंचावर आभासी चलनाचे व्यवहार कंपनीकडून चालविले जातात असे भासविले गेले. त्याला साखळी विपणनाची जोड देत नवीन गुंतवणूकदारांची भर घालण्यात आल्याचे सीबीआयने नमूद केले. सुरुवातीच्या काळात गुंतवणूकदारांना बिटकॉइनमध्ये लाभाची रक्कम मिळाल्याने विश्वास निर्माण झाला. मात्र नंतर नवीन गुंतवणूक कमी होताच २०१७ पासून समस्या सुरू झाल्या. तोटा भरून काढण्यासाठी एमकॅप या स्वनिर्मित कूटचलनात गेनबिटकॉइनने पैसै वळविले. गुंतवणूकदारांची दिशाभूल करण्याचा हातखंडा म्हणून हा बनाव निर्माण करण्यात आला. गुंतवणूकदारांना त्यांची फसगत झाल्याचे आढळून आल्यानंतर या घोटाळ्यात देशभरात अनेक ठिकाणी गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने याचा तपास सीबीआयकडे सोपविला. फसवणुकीची संपूर्ण व्याप्ती उलगडण्यासाठी आणि सर्व आरोपींची ओळख पटविण्यासह, अपहार झालेल्या निधीचा आंतरराष्ट्रीय व्यवहारांसह संपूर्ण छडा लावण्यासाठी तपास सुरू असल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे. मंगळवारच्या मोहिमेतून गुन्हेगारी स्वरूपाचे डिजिटल पुरावे, डिजिटल उपकरणे तसेच ईमेल/क्लाउडमधील पुरावे हाती लागल्याचे तपास यंत्रणेने म्हटले आहे.

अमेरिकी अतिरिक्त शुल्काचा भारतावर अल्प परिणाम; जागतिक संस्थेचा निर्वाळा

नवी दिल्ली, दि. २६ (वृत्तसंस्था) : अमेरिकेकडून व्यापारावर अतिरिक्त शुल्क आकारले जाणार असून, त्याचा परिणाम आशिया प्रशांत विभागातील इतर देशांच्या तुलनेत भारतावरील परिणाम अल्प राहिल, मात्र खाद्य, वस्त्रोद्योग आणि औषधनिर्माण या क्षेत्रांना याचा जास्त फटका बसण्याची शक्यता आहे, असा अंदाज मूडीज रेटिंग्ज या जागतिक पतमानांकन संस्थेने मंगळवारी वर्तविला.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह सर्व व्यापार भागीदार देशांवर जशास तसे शुल्क आकारण्याची भूमिका जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर मूडीजने म्हटले आहे की, अमेरिका आणि भारत यांच्या व्यापारात एकसारखे शुल्क आकारले गेल्यामुळे दबाव येणार आहे. हा दबाव कमी करण्यासाठी दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू आहे. भारताकडून अमेरिकेच्या काही उत्पादनांवरील आयात शुल्क कमी करण्याची चर्चा सुरू आहे. याचबरोबर अमेरिकेच्या कृषी उत्पादनांना जास्तीत जास्त भारतीय बाजारपेठ खुली करणे आणि अमेरिकेकडून ऊर्जा खरेदी यावरही चर्चा सुरू आहे. याबाबतचा व्यापार करार या वर्षाअखेरीस लागू होण्याची शक्यता आहे.

अमेरिकेकडून खाद्य आणि औद्योगिक साहित्याची निर्यात सर्वाधिक आहे. याचवेळी आशिया प्रशांत विभागातील देश भांडवली वस्तू, वाहने आणि त्यांचे सुटे भाग व ग्राहकोपयोगी वस्तूंची जास्त आयात करतात. अमेरिकेकडून समान शुल्क आकारणी झाल्यास या विभागातील संगणक, इलेक्ट्रॉनिक उत्पादन, रसायने, वाहने, खाद्य, वस्त्रोद्योग आणि लाकडी उत्पादने या क्षेत्रांवर परिणाम होईल. इतर देशांच्या तुलनेत भारताचा या क्षेत्रांमधील व्यापार अमेरिकेशी कमी आहे. भारतातील खाद्य, वस्त्रोद्योग आणि औषधनिर्माण या क्षेत्रांना मात्र जोखीम आहे, असे मूडीजने नमूद केले आहे.

अमेरिकेच्या व्यापार शुल्कात वाढ झाल्यास आशिया प्रशांत विभागातील भारत, व्हिएतनाम आणि थायलंड या देशांवर परिणाम होईल. इलेक्ट्रॉनिक्स, वाहने, खाद्य आणि वस्त्रोद्योग या क्षेत्रांवर याचा सर्वाधिक परिणाम होईल. यातून या देशांची निर्यातीतील कमी होईल. यामुळे चीनच्या निर्यातीवर भर देणाऱ्या विकासाच्या पद्धतीचे अनुकरण करणाऱ्या या विभागातील विकसनशील अर्थव्यवस्थांना फटका बसण्याची शक्यता आहे.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे सर्वांना देण्यात येते की, **न्यु आयडीअल होम को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड,** हे खालील निर्देशित मालमत्तेच्या संबंधात खालील लिखीत अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेचे परिपूर्ण मालक आहेत व त्यांच्या हक्कांची मी पडताळणी करत आहे.

कोणाही व्यक्तीस खालील निर्देशित मालमत्तेच्या संबंधात कोणतेही दावे, हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास तसेच वरील निर्देशित विक्री करार संबंधात ताबा, वारसा वा अधिकार वा कोणत्याही स्वरूपातील काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर अधोहस्ताक्षरित यांना त्यांचे कार्यालय पत्ता वकील नेविल छेडा, सी/ओ छेडा ॲन्ड असोसिएट्स, दुकान क्र. ७ व ८, तळ मजला, मधूर सीएचएसएल, टी. पी. एस. ५५ व ५६ वा रोड, वीर सावरकर गार्डनजवळ, नाना पालकर स्मृती समिती मार्ग, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२ येथे संबंधित करार व/वा दस्तावेज यांच्या प्रमाणित प्रत समवेत सदर तारखेपासून **१५ (पंधरा) दिवसांच्या** आत लेखी स्वरूपात सदर सादर करणे आवश्यक आहे अन्यथा खालील निर्देशित जागेची पडताळणी कोणत्याही दावे वा आक्षेप काही असल्यास ते कोणत्याही संदर्भाविना हस्तांतरण पूर्ण करण्यात येईल व सदर दावे काही असल्यास ते अधित्यागीत व परित्यागीत मानले जातील. आम जनतेकडून कोणतेही उत्तर नंतर विचारात घेतले जाणार नाही.

वरील संदर्भित मालमत्तेची अनुसूची :

सर्व तो जमिनीचा भाग व भूखंड असलेली जमिन मोजमापित **७९२.५० चौरस मीटर** मालमत्ता कार्ड अनुसार **अंतिम प्लॉट क्र. ३७ (बी)** (उप प्लॉट मूळ प्लॉट क्र. ३७ धारक बोरिवली टाउन प्लॅनिंग योजना क्र. (२) संबंधित **सीटीएस क्र. १७०** धारक गाव कान्हेरी तालूका बोरिवली येथील नोंदणीकरण जिल्हा व उप जिल्हा मुंबई उपनगरीय येथील बिल्डींग आयडीअल होम म्हणून ज्ञात व एकूण २० फ्लॅट्स असलेले १ला, कस्तुरबा क्रॉस रोड, बोरिवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६ येथील.

सही/-
श्री. नेविल पी. छेडा
वकील उच्च न्यायालय

ठिकाण : मुंबई
दि. २७.०२.२०२५

ICICI Home Finance | कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९ भारत.

शाखा कार्यालय : कार्यालय क्र. एफबी-७, एफबी-११७, एफबी-११८, एफबी-११९, १ ला मजला, हायलँड कॉर्पोरेट सेंटर, कापूरबावडी जंक्शन, माजीवाडे ठाणे (प) ४०० ६०७.

प्रायव्हेट ट्रिटी मार्फत स्थावर मालमत्तेची विक्रीकरिता सूचना

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८(८)/ नियम ९(१) सहवाचन स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना.

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी) यांनी खालील निर्देशित गहाण मालमत्तेची विक्रीकरिता ई-लिलाव आयोजित केला होता. त्यामुळे, सर्व सदर ई-लिलाव रद्द झाले आहेत. आता, इच्छुक खरेदीदार यांनी आयसीआयसीआय एचएफसी यांना राखीव मूल्य रु. ३०,००,०००/- खरेदी करण्याकरिता प्रस्ताव. सूचना याद्वारे आम जनतेस विशेषत: कर्जदार व हमीदार यांना देण्यात येते की, खालील निर्देशित स्थावर मालमत्ता/ प्रभारित प्रतिभूत धनको यांना आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. यांच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे ताबा घेण्यात आलेल्या मालमत्तेची विक्री जशी आहे, जेथे आहे व जेथे कुठे आहे आधारावर व जेव्हा पण आधारावर खालील निर्देशित अनुसार करण्यात येत आहे.

अनु. क्र.	कर्जदार/ सह -कर्जदार/ हमीदार यांचे नाव/ कायदेशीर वारस, कर्ज खाते क्र.	प्रतिभूत मालमत्तेचा तपशील ज्ञात अडथळे, जर काही असल्यास	थकित रक्कम	राखीव मूल्य, इसारा रक्कम ठेव	मालमत्ता पडताळणी तारीख व वेळ	लिलावाची तारीख व वेळ	लिलाव तारखेपूर्वी एक दिवस	सरफैसी चरण
ए	बी	सी	डी	ई	एफ	जी	एच	आय
१.	कमलेश बच्चुभाई परमार (कर्जदार) दर्शना कमलेश परमार (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएमएमआर ०००००१३३६१७२	फ्लॅट क्र. ११, २ रा मजला, किशन महाल सीएचएसएल, एस. क्र. १८ (भाग), गाव नौपाडा, हरिनिवास सर्कल एम. जी. रोड, ठाणे पश्चिम.	रु. ६७,७४, ६९४/- २१ जानेवारी, २०२५	रु. ३०,००, ०००/- रु. ३,००, ०००/-	दि. ११ मार्च, २०२५ रोजी स. ११.०० ते ३.००	१८ मार्च, २०२५ रोजी २.०० ते ३.००	१७ मार्च, २०२५ रोजी ४.०० पूर्वी	प्रत्यक्ष ताबा

ऑनलाइन लिलाव वेबसाइट URL Link- https://assets.matexauctions.com वर आमची लिलाव एजन्सी मॅटेक्स नेट प्रा. लि. मार्फत आयोजित केला आहे. प्रस्तावित बोलीदार यांनी इसारा रक्कम ठेव (इरठे) आरटीजीएस/ डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई) आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड बरील पत्यावर येथे दि. १७ मार्च, २०२५ रोजी ४.०० पूर्वी करावे. प्रस्तावित बोलीदारांनी कृपया स्वाक्षरीकृत प्रत नोंदणीकृत स्वरूपात व बोली अटी व शर्तीवर आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड बरील निर्देशित शाखा पत्ता येथे दि. १७ मार्च, २०२५ रोजी ५.०० पूर्वी सादर करावी व इसारा रक्कम ठेव डिमांड ड्राफ्ट (डीडी) राष्ट्रीय/ अनुसूचीत बँक मार्फत आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड - लिलाव मार्फत बरील निर्देशित पत्यावर येथे प्रदान करावे.

आम जतनेस सूचित करण्यात येते की त्यांची बोली सादर करावी व रक्कम इच्छुक खरेदीदार यांना बरील निर्देशित अनुसार प्रस्तावति आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की, रक्म बरील निर्देशित इच्छुक खरेदीदार यांना आयसीआयसीआय एचएफसी यांच्याद्वारे स्विकृत झाली आहे, गहाण मालमत्तेची विक्री सदर इच्छुक खरेदीदार यांच्या सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८(८) व नियम ९(१) अनुसार असेल.

कोणत्याही पुढील स्पष्टीकरणाकरिता कृपया लिलावाच्या अटी व शर्ती पाहाव्या व निविदेचे सादरीकरण कृपया आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांना ९९२०८०७३०० वर संपर्क साधावा.

प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे कोणतेही कारण न देता सर्व बोली रद्द करण्याचा अधिकार राखून आहे. पुढील विक्रीच्या अटी व शर्तीकरिता कृपया https://www.icicihfc.com ला भेट द्यावी.

दि. २७ फेब्रुवारी २०२५
ठिकाण : ठाणे

प्राधिकृत अधिकारी,आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड
सीआयएन क्रमांक : U65922MH1999PLC120106

UGRO CAPITAL

यु ग्रो कॅपिटल लिमिटेड
४ था मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझीनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई ४०० ०७०.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ व ९ च्या तरतूदी सहवाचन अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या (प्रतिभूत मालमत्ता) विक्रीकरिता ३० दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारे आम जनतेस व विशेषत: कर्जदार व हीमदार यांना देण्यात येते की, खालील प्रमाणे निर्देशित पतिभूत मालमत्ता या **यु ग्रो कॅपिटल लिमिटेड (प्रतिभूत धनको)** यांच्याकडे तारणगहाण/ प्रभारित ठेवण्यात आल्या आहेत त्यांचा ताबा संरक्षित धनको यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे व त्यांची विक्री **जशी आहे जेथे आहे व जे आहे ते आहे व जे आहे जसे** आहे आधारावर खालील निर्देशित तारीख व वेळेत, खालील प्रमाणे निर्देशित थकबाकीची पूर्तता करेपर्यंत व पुढील रक्कम अदा होईपर्यंत त्यावरील पुढील व्याज व अन्य खर्च यांच्यासह जे संरक्षित धनको आहेत त्यांना खालीलप्रमाणे करण्यात आलेल्या कर्जदार व हमीदार यांच्याकडून येणे आहे व रक्कमेच्या वसुलीकरिता करण्यात येत आहे. राखीव मूल्य, इसारा रक्कम ठेव (इरठे) व इरठे जमा करण्याची अंतिम तारीख खालीलप्रमाणे निर्देशित आहे :

अनु. क्र.	कर्जदार/ हमीदार यांचा तपशील	मागणी सूचना तपशील	लिलाव तपशील	
१.	१. तेजपाल एन्टरप्रायजेस २. तखत सिंह ३. छैलकनवार तखतसिंह चंपावत कर्ज खाते क्रमांक : एचसीएफएमएचओएसईसी ००००१०१९७४९	सूचनेची तारीख : ११.०५.२०२४ थकित रक्कम : रु. ३२५२६१८/- दि. ११.०५.२०२४ अनुसार	राखीव मूल्य	रु. ४९३८५००/-
			इठे	रु. ४९३८५०/-
			इठे जमा करण्याची अंतिम तारीख	०२.०४.२०२५
			लिलाव तारीख :	०३.०४.२०२५
			लिलाव वेळ	११.०० ते ०१ पर्यंत
			विस्तार मूल्य	रु. १,००,०००/-

प्रतिभूत मालमत्तेचे विवरण : सर्व तो भाग व भूखंड असलेली स्थावर मालमत्ता धारक दुकान क्र. ०९, तळ मजला, विमल प्लाझा वेल्फेअर सोसायटी (गोलानी रेसिडेन्शीअल कॉम्प्लेक्स) सि. क्र. ९६/३ + ९६/४ + ९६/७ (भाग), गोलानी नाकाजवळ, गाव वाळीव, वसई पूर्व, तालूका वसई, जिल्हा पालघर महाराष्ट्र ४०१ २०८ पिनकोड ४०१ २०८.

विस्तृत विक्रीच्या अटी व शर्तीकरिता कृपया यु ग्रो कॅपिटल लिमिटेड / प्रतिभूत धनकोची वेबसाइट <www.ugrocapital.com> वर प्रदानित लिंक पाहावी व अधोहस्ताक्षरित यांना authorised.officer@ugrocapital.com वर संपर्क साधावा.

ठिकाण : मुंबई
दि. २७.०२.२०२५

सही/- (प्राधिकृत अधिकारी)
यु ग्रो कॅपिटल लिमिटेड करिता

जाहीर सूचना

सर्वांना याद्वारे सूचित करण्यात येते की, माझे अशील श्री. संतोष पांडुरंग पारधे व श्रीम. वर्षा संतोष पारधे हे फ्लॅट क्र. ४०३, ब्ल्यू गॅलक्सी २ ए विंग सीएचएसएल आनंद नगर समोर, दहिसर पूर्व मुंबई ४०० ०६८ मोजमापित क्षेत्रफळ ६५६ बिल्ट अप क्षेत्रफळ, सीटीएस क्र. १२७१ व ११८३ ए धारक मालमत्ता माझे अशील यांनी खरेदी केली होती व ती मे. पाथारे ॲन्ड असोसिएशन कडून करार दि. ०६ मे, २००३ रोजी खरेदी केली होती व उप-निबंधक बोरिवली ३ यांच्यासह दस्तावेज क्र. बीडीआर-६-३९५१-२००३ अंतर्गत दि. ०९.०५.२००३ रोजी नोंदणीकृत होती.

ब्ल्यू गॅलक्सी २ को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. यांनी शेअर प्रमाणपत्र क्र. १५ दि. ८ सप्टेंबर, २०१३ रोजी पाच शेअर्स रु. ५० प्रत्येकी धारक विभिन्न क्र. ७१ ते ७५ असलेल्या माझे अशील श्री. संतोष पांडुरंग पारधे व श्रीम. वर्षा संतोष पारधे यांनी सदर फ्लॅट संबंधात केले होते व सदर शेअर प्रमाणपत्र माझे अशील यांच्याद्वारे गहाळ/ हरवले आहेत व माझे अशील यांनी पोलीस तक्रार धारक क्र. २५५७३/२०२५ दि. २५.०२.२०२५ अंतर्गत दहिसर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती.

कोणाही व्यक्तीस सदर फ्लॅट संबंधात कोणतेही दावे वा हितसंबंध असल्यास तसेच विक्री, भेट, भाडेकरार, वारसा, अदलाबदल, गहाण, प्रभार, धारणाधिकार, न्यास, ताबा, सुविधाधिकार, जप्ती वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर तारखेपासून ७ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा सदर कोणतेही दावे काही असल्यास ते अधित्यागीत मानले जातील.

ठिकाण : मुंबई दि. २७.०२.२०२५
पंकज कुमार द्विवेदी (वकील उच्च न्यायालय)
कार्यालय : छबीनाथ पांडे कंपाऊंड, एअर पोर्ट रोड, मरोळ नाका, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, **श्री. भगवानदास जे. भाटिया** हे फ्लॅट क्र. ३०३, बी विंग, तिसरा मजला, मोजमापित ५५० **चौ. फूट बिल्ट अप अर्थात ५१.११ चौ. मीटर बिल्ट अप क्षेत्रफळ,** रोनक को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड, नोंदणीकरण क्र. **टीएनए/(टीएनए)/एचएसजी/(टीसी)/१४९४६/२००३-०४,** ९० फूट रोड, भाईंदर (प) ठाणे ४०१ १०१ येथील मालमत्तेचे सह-मालक/ सभासद व कायदेशीर वारस आहेत. **१. मे. सुदामा इस्टेट ॲन्ड बिल्डर्स (प्रा) लि. व श्री. भगवानदास जे. भाटिया व दिवंगत श्रीम. मंजू भगवानदास भाटिया** यांच्या दरम्यान करार दि. १५.११.२००२ रोजी दस्तावेज अंतर्गत नोंदणीकृत करून उप निबंधक हमी यांचे कार्यालय ठाणे जिल्हा येथील दस्तावेज सिरीयल क्र. **टीएनएन-७-०५४४७-२००२ दि. १५.११.२००२** अंतर्गत नोंदणीकृत आहे. **(बिल्डर्स करार).** पुढे दिवंगत **श्रीम. मंजू भगवानदास भाटिया** यांचा मृत्यू दि. **२८.०७.२०२२** रोजी भाईंदर (पश्चिम) ठाणे येथे झाला. **त्यांच्या मागे त्यांचे केवळ कायदेशीर वारस १. श्री. भगवानदास जे. भाटिया (दिवंगत श्रीम. मंजू भगवानदास भाटिया यांचे पती), २. श्री. हेमंत भगवानदास भाटिया (दिवंगत श्रीम. मंजू भगवानदास भाटिया यांचा मुलगा)** हे आहेत. सोसायटीने शेअर प्रमाणपत्र अर्जदार शेअर प्रमाणपत्र क्र. ३० विभिन्न क्र. १४६ ते १५० त्यांच्या नावे जारी केले आहेत. आता अर्जदार हे सदर फ्लॅटचे मालक आहेत.

सर्व व्यक्ती/ बँक, वित्तीय संस्था, बैयक्तिक कंपनी संस्था आदी यांना कोणतेही हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास तसेच कायदेशीर वारस असल्यास तंना कोणतेही दावे, काही असल्यास दावे, आक्षेप त्यांनी योग्य पुराव्यांसह सदर सूचनेच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा कोणाही व्यक्तीचे कोणतेही दावे सदर मालमत्ता जागा संबंधात आक्षेप वा दावे गृहित धरले जाणार नाहीत.

दि. २७.०२.२०२५
दिलीप के. पांडे
(वकील उच्च न्यायालय)
बी/१०९, भाईदया नगर बी बिल्डींग, नवघर रोड, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०५.

जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, मूळरित्या **श्री. उर्मिला रमेश जोशी व श्री. रमेश गजानन जोशी** हे फ्लॅट क्र. ए-७०२, ७ वा मजला, भूमी क्लासीक सीएचएस लि. (नोंदणीकरण क्र. एमयूएम/एचएसजी/टीसी/१२२९०/२००३/०४/२००३ दि. १५.१२.२००३) अंतर्गत लिंक रोड, मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४ मोज. ८८० चौ. फूट बिल्ट अप क्षेत्रफळ ८१.७८ चौ. मीटर बिल्ट अप क्षेत्रफळ धारक मालमत्तेचे कायदेशीर सह-मालक आहेत व त्यांनी सदर मे. भूमी - ऐवोरा बिल्डर्स कडून करार दि. ०८.०७.२००२ अंतर्गत नोंणीकृत दस्तावेज क्र. बीडीआर-२/०४८९७/२००२ दि. १४.०८.२००२ अंतर्गत त्यांच्या नावे केले हो